Kamdhenu Sevabhavi Sanstha's

Est. Year - 2000

**VASUNDHARA COLLEGE OF ARTS, SCIENCE & COMMERCE, GHATNANDUR**

NAAC Accredited 'B++' Grade, With CGPA 2.77

Affiliated to Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad

Dr. Arun Dalve
(M.A.,B.Ed.,Ph.D.)
Principal

Mob. 9822898727
Mob. 9421342148
Mob. 9923019540
Website: www.vasundharacollege.org.in
E-mail - principalvcg@rediffmail.com

Ghatnandur, Tq. Ambajogai, Dist.Beed.Pin - 431519 (Maharashtra) E-mail-vasundharacollege2000@gmail.com

outward No.VCG/2022-23

# 5.2.1

**Number of placement of outgoing Student during the year**

महाराष्ट्र शासन
उपसंचालक आरोग्य सेवा
पुणे मंडळ, पुणे.

०२०-२६१२६८७० (वैय.)
०२०-२६०५२३०० (कार्या.)
०२०-२६१३५१३६

e-mail : ddhspunecircle@gmail.com
ddhs.pune-mh@gov.in
cpmnrhmpune11@gmail.com

नविन प्रशासकीय इमारत,
तिसरा मजला, खोली क्र३०१.
विधानभवनसमोर, पुणे-४११००१

| आरोग्य सेवा | जा..क्र.उसआसे/आस्था/सरळ सेवा/नियुक्ती/अवैद्यकीय सहा./गट-क/ /२४<br>दि. ६ / ०३ /२०२४ |
|---|---|

विषय:- अवैद्यकीय सहाय्यक, गट-क या पदावरील नियुक्ती बाबत...

संदर्भ :-१) आरोग्य सेवा आयुक्तालयाचे दिनांक १५/०३/२०२३ रोजीची प्रसिध्द जाहिरात.
२) सहसंचालक आरोग्य सेवा(हि.ह.ज.रो)पुणेयांचे पत्र ससंआसे/पदभरती/परिक्षा/कागदपत्र पडताळणी/२४१७-२५१५/कक्ष-५२ अ/न.क्र.२०२४/दि.०२.०२.२०२४.
३) मे टि.सी.एस. आयओएन यांचेकडील दिनांक. १०.०२.२०२४ रोजीचे प्रसिध्द निवड यादी.
४) दिनांक २१/०२/२०२४ रोजीचे समुपदेशन.
५) सहसंचालक, आरोग्य सेवा(कुष्ठरोग व क्षयरोग)पुणे-६ यांचे पत्र जा.क्र.ससंआसे/ कुष्ठवक्षय/आस्था-९९(ब)/अवैस पदभरती/नियुक्ती फाईल/३३०३-०७ दि.०१/०३/२०२४

उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ पुणे यांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन अवैद्यकीय सहाय्यक या पदावर वेतनस्तर एस ८: (२५५००-८११००) निव्वळ तातुपरत्या स्वरुपात नियुक्तीचे आदेश खालील प्रमाणे निर्गमित करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव व पत्ता | नियुक्तीचा प्रकार | नियुक्ती प्रवर्ग | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती. वैष्णवी संतोष इंगळे | सरळसेवा | (खुला-महिला राखीव) | पर्यवेक्षकीय नागरी कुष्ठरोग पथक, सोलापूर,जि.सोलापूर |

सदरचे आदेश खालील अटी व शर्तीचे अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहेत :-

१) सदर नेमणूकीचे आदेश प्राप्त होताच ८दिवसांचे आंत आपणांस दिलेल्या नियुक्तीच्या ठिकाणी हजर व्हावेव रुजू अहवाल सर्वसंबंधितांना सादर करावा. आपण विहीत कालावधीत हजर न झाल्यास आपण हजर होण्यास इच्छूक नाही, असे गृहीत धरुन आपली नेमणूक रद्द करण्यांत येईल.

२) आपली नेमणूक जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून प्राप्त होणा-या शारिरीकदृष्टया पात्र असल्याच्या आधारावर अवलंबून राहील. सदर प्रमाणपत्राव्दारे आपणांस शासकीय सेवेस अपात्र ठरविल्यास आपली सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

३) आपली नियुक्ती ही पोलीस खात्याकडून आपले पुर्व-चारित्र्य व वर्तणूक अहवाल प्राप्त होण्याच्या अधिन राहून करण्यातयेत असून, सदर अहवालामध्ये काही आक्षेपार्ह नोंदी आढळल्यास आपली सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

४) आपली नियुक्ती सादर केलेल्या नॉन क्रिमिलेअर (एन.सी.एल.) प्रमाणपत्रच्या पडताळणीच्या अधिन राहून देण्यात येत आहे. सदर प्रमाणपत्र अवैध ठरल्यास आपली सेवा समाप्ती करण्यात येईल.

५) आपण हिंदी व मराठी भाषा संबंधीच्या नियमावलीनुसार जर या अगोदर हिंदी व मराठी भाषा उत्तीर्ण झाले नसाल किंवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर आपणांस एतदर्थ मंडळाची हिंदी व मराठी भाषा विषयाची परीक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

६) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण-२०००/प्र.क्रं.६१/२००१/३९, दि.१९.३.२००३ आपणांस संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान एक अतिरिक्त आवश्यक अर्हता म्हणून निश्चित करण आलेली आहे. त्यामुळे आपणांस शासनमान्यता प्राप्त संस्थेचे संगणक हाताळणी / वापराबाबतचे प्रमाणप सादर करणे आवश्यक राहील. ज्यांच्याकडे सध्यस्थितीत अशा प्रकारचे प्रमाणपत्र नसेल त्यांनी सदर आदेशाच्या दिनांकापासून २ वर्षाच्या आंत संगणक प्रभाणपत्र (एम.एस.सी.आय.टी.) सादर करणे अनिवार्य राहील.

७) आपण, **अवैद्यकीय सहाय्यक** या पदाचा कार्यभार धारण केल्याच्या दिनांकापासून १ वर्ष कालावधी हा परिविक्षाधीन कालावधी राहील. परिविक्षाधीन कालावधीत कामाचा अपेक्षित दर्जा प्राप्त न केल्यास किंवा वर्तणूक समाधानकारक न आढळल्यास त्यांची सेवा संपुष्टात आणण्यात येईल किंवा परिविक्षाधीन कालावधी नियमानुसार वाढविण्यात येईल.

८) वित्त विभागाकडील शासन निर्णय शासन निर्णय क्र. अंनियो-१००५/१२६/सेवा-४, मंत्रालय,मुंबई दिनांक ३१.१०.२००५ नुसार दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर त्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होताच उमेदवारांस नविन परिभाषित अंशदान निवृत्तीयोजना लागू राहील. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशिकरण) (नियम-१९८४) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

९) शासन परिपत्रक सा.प्र.वि.क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/१२,दि.१.७.२००५ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील प्रतिज्ञापत्र नेमणूक स्विकारताना भरुन देणे बंधनकारक राहील. सदर प्रतिज्ञापत्रातील माहिती खोटी आढळून आल्यास उमेदवाराची नियुक्ती तात्काळ संपुष्टात येईल.

१०) उमेदवारास राष्ट्रीयत्वाची व गोपनीयतेची शपथ घ्यावी लागेल.

११) सदर पदास शासनाने विहीत केलेले प्रशिक्षण पूर्ण करणे अनिवार्य राहील.

१२) आपली बदली मंडळ/राज्यात कोणत्याही ठिकाणी लोकहितास्तव करण्यात येईल.

१३) आपणास राजीनामा दयावयाचा झाल्यास एक महिना आगाऊ पूर्वसूचना देणे आवश्यक राहील अन्यथा एक महिन्याचे मूळ वेतनाची रक्कम कोषागारात भरणा करावी लागेल.

१४) उमेदवारास एक पत्नी/पती हयात असताना दुसरा विवाह करता येणार नाही.

१५) उमेदवारास नोकरीत असताना पूर्व परवानगी शिवाय दुसरीकडे नोकरी/ व्यवसाय स्विकारता येणार नाही.

१६) नेमणूकीच्या ठिकाणी हजर होण्याकरीता कोणत्याही प्रकारचा प्रवास खर्च अथवा दैनिक भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

१७) आपण नियुक्तीसंदर्भात सादर केलेली सर्व कागदपत्रे खोटी आढळून आल्यास आपणाविरुध्द कायदेशीर कारवाई करुन सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

१८) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक १२-१२-२०११ मधील परिच्छेद क्रमांक ३ नुसार उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिण्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबधीत जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील. जात पडताळणी समितीने त्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविले, तर त्यांची नियुक्ती त्वरित रद्द करण्यात येईल आणि त्या उमेदवाराविरुध्द महाराष्ट्र अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र व त्याच्या पडताळणी विनियमन) अधिनियम २००० मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल. तसेच शासकिय सेवेत कार्यरत असलेल्या उमेदवाराच्या बाबतीत त्यांच्या विरुध्द शिस्तभंगाची सुरु अथवा प्रस्तावित नाही याबाबीच्या अधिन राहून नियुक्ती देण्यात येत आहे.

१९) सेवेच्या सर्वसाधारण शर्तीच्या अनुषंगाने शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सेवा शर्ती बंधनकारक राहतील.

२०) शाळा सोडल्याचे प्रमाणपत्रात नोंदविण्यात आलेली जन्मतारीख ही बरोबर असून त्याबाबत त्यांनी कोणतीही तक्रार नसल्याचे प्रमाणपत्र कार्यालयास त्वरीत सादर करावे लागेल. मूळ सेवापुस्तकात करण्यात आलेली जन्मतारखेची नोंद उमेदवाराने नेमणूक स्विकारल्यापासून पाच वर्षानंतर बदलण्यात येणार नाही.

२१) ज्या उमेदवारांची दिव्यांग प्रवर्गातून निवड झालेली आहे, अशा उमेदवारांनी शासन सेवेसाठी वैद्यकियदृष्टया पात्र असल्याबाबतचे प्रमाणपत्र वैद्यकीय मंडळाकडुन प्राप्त करुन घेऊन ते कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

२२) संबंधित कार्यालय प्रमुखाने उमेदवार हजर होते वेळी त्यांच्या शैक्षणिक अर्हतेच्या व इतर प्रमाणपत्राच्या मूळ कागदपत्रांची तपासणी करावी.

२३) उमेदवाराला हजर करून घेतांना त्याच्या आधार नंबरशी बायोमेट्रिक यंत्रणेद्वारे पडताळणी करून घेण्यात येईल. यात काही तफावत आढळल्यास नियुक्ती आदेश रद्द करण्यात येईल.

( डॉ. राधाकिशन पवार )
उपसंचालक,
आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे.

प्रति,
श्रीमती. वैष्णवी संतोष इंगळे
रा. करकट्टा, पो.मुरुड, ता.लातूर, जि. लातूर
२/- उमेदवाराने प्रथम सहाय्यक संचालक आरोग्य सेवा(कुष्ठरोग) सोलापूर येथील कार्यालयात हजर व्हावे.

प्रत :- सहाय्यक संचालक,आरोग्य सेवा,(कुष्ठरोग) सोलापूर
२/- वरील उमेदवारास वैद्यकीय अधिकारी, पर्यवेक्षकीय नागरी कुष्ठरोग पथक, सोलापूर या ठिकाणी रुजू करुन घ्यावे व अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

प्रत:- वैद्यकीय अधिकारी,पर्यवेक्षकिय नागरी कुष्ठरोग पथक, सोलापूर

प्रत सविनय सादर:-
मा. अप्पर मुख्य सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय,मुंबई.
मा. आयुक्त आरोग्य सेवा, तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान संचालनालय, मुंबई.
मा. संचालक, आरोग्य सेवा, संचालनालय, पुणे-१
मा .सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्यरोग)पुणे-१
मा. सहसंचालक आरोग्य सेवा(कुष्ठरोग व क्षयरोग) पुणे-६

प्रत - वरीष्ठ कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, सोलापूर

२०) शाळा सोडल्याचे प्रमाणपत्रात नोंदविण्यात आलेली जन्मतारीख ही बरोबर असून त्याबाबत त्यांनी कोणतीही तक्रार नसल्याचे प्रमाणपत्र कार्यालयास त्वरीत सादर करावे लागेल. मूळ सेवापुस्तकात करण्यात आलेली जन्मतारखेची नोंद उमेदवाराने नेमणूक स्विकारल्यापासून पाच वर्षानंतर बदलण्यात येणार नाही.

२१) ज्या उमेदवारांची दिव्यांग प्रवर्गातून निवड झालेली आहे, अशा उमेदवारांनी शासन सेवेसाठी वैद्यकियदृष्ट्या पात्र असल्याबाबतचे प्रमाणपत्र वैद्यकीय मंडळाकडुन प्राप्त करुन घेऊन ते कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

२२) संबंधित कार्यालय प्रमुखाने उमेदवार हजर होते वेळी त्यांच्या शैक्षणिक अर्हतेच्या व इतर प्रमाणपत्राच्या मूळ कागदपत्रांची तपासणी करावी.

२३) उमेदवाराला हजर करून घेतांना त्याच्या आधार नंबरशी बायोमेट्रिक यंत्रणेद्वारे पडताळणी करून घेण्यात येईल. यात काही तफावत आढळल्यास नियुक्ती आदेश रद्द करण्यात येईल.

(डॉ. राधाकिशन पवार)
उपसंचालक,
आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे.

प्रति,
श्रीमती. वैष्णवी संतोष इंगळे
रा. करकट्टा, पो.मुरुड, ता.लातूर, जि. लातूर
२/- उमेदवाराने प्रथम सहाय्यक संचालक आरोग्य सेवा(कुष्ठरोग) सोलापूर येथील कार्यालयात हजर व्हावे.

प्रत :- सहाय्यक संचालक,आरोग्य सेवा,(कुष्ठरोग) सोलापूर

२/- वरील उमेदवारास वैद्यकीय अधिकारी, पर्यवेक्षकीय नागरी कुष्ठरोग पथक, सोलापूर या ठिकाणी रुजू करुन घ्यावे व अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

प्रत:- वैद्यकीय अधिकारी,पर्यवेक्षकिय नागरी कुष्ठरोग पथक, सोलापूर

प्रत सविनय सादर:-
मा. अप्पर मुख्य सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय,मुंबई.
मा. आयुक्त आरोग्य सेवा, तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान संचालनालय, मुंबई.
मा. संचालक, आरोग्य सेवा, संचालनालय, पुणे-१
मा .सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्यरोग)पुणे-१
मा. सहसंचालक आरोग्य सेवा(कुष्ठरोग व क्षयरोग) पुणे-६

प्रत - वरीष्ठ कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, सोलापूर

I/C PRINCIPAL
प्राचार्य
Vasundhara College of Arts,
Science & Commerce, Ghatnandur
Tq. Ambajogai, Dist. Beed